REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 3 | DECEMBER - 2018

# आर्थिक विकासाच्या वेगाला सोन्याच्या साठयाचा आधार



**प्रा.डॉ.शिवाजी भ. यादव**
अर्थशास्त्र विभागप्रमुख , शिवछत्रपती कला महाविद्यालय, पाचोड
ता.पैठण, जि.औरंगाबाद.

## प्रस्तावना :–

जगातील प्रत्येक देश आर्थिक विकासाचे उद्दिष्टये पूर्ण करण्याच्या प्रयत्नात आहे. हे प्रयत्न तेव्हाच यशस्वी होतात जेव्हा त्या देशाकडे नैसर्गिक साधन सामग्री मोठया प्रमाणात उपलब्ध आहे. जगात असे काही देश आहेत की, त्या देशात नैसर्गिक साधन संपत्ती मोठया प्रमाणात नसताना सुध्दा आर्थिक विकासाचे उद्दिष्टये साध्य केलेले आहे. पृथ्वीवरील स्थानानुसार प्रत्येक देश आर्थिक उलाढालीशी जोडल्या गेलेला आहे. याचा अर्थ देशाच्या अर्थव्यवस्थेची चाके दैनंदिन गरज असणाऱ्या खनिज संपत्तीमधील तेल, नैसर्गिक वायु, पोलाद, लोखंड, चांदी व सोने यावर अवलंबून आहे. ज्या देशांकडे नैसर्गिक साधन संपत्ती इतर देशाच्या तूलनेत जास्त आहे ती, देश श्रीमंत समजली जातात. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील वस्तूंच्या किंमती हया त्या देशाच्या आर्थिक विकासाचा वेग निश्चित करतात. 2008 मध्ये जगात आलेल्या आर्थिक मंदीने सर्वच जगातील देशाच्या अर्थव्यवस्थेवर कमी अधिक परिणाम केला होता. आर्थिक मंदीतून अर्थव्यवस्था बाहेर काढण्यासाठी आर्थिक पॅकचे जाहिर करण्यात आले होते. याचाच परिणाम म्हणून जगातील सर्व देश आर्थिक मंदीतून बाहेर पडलेले आहेत. अमेरिका, आशिया, आफ्रीकापासुन युरोपपर्यंत उद्योग व नोकऱ्यांच्या संधीतील वाढ ही अर्थव्यवस्थांची आकडेवारी सकारात्मक वाटचाल करत असल्याचे दिसते. आर्थिक विकाससंदर्भात 'द कॉन्फरन्स बोर्ड या न्युयॉर्कमधील उद्योग व संशोधन' संस्थेने जगातील काही देशांच्या आर्थिक वृध्दीचा अहवाल 2017 मध्ये जाहिर केला. या अहवालात चीन, भारत, इंडोनेशिया, तूर्की याचा वृध्दीदर जवळपास 8 टक्के, कॅनडा, दक्षिण कोरिया, मेक्सिको, अमेरिका, युरोप क्षेत्र यांचा 3.6 टक्के व रशिया, ऑस्ट्रेलिया, युक्रे, जपान व ब्राझील या देशाचा आर्थिक वृध्दीदर 5.6 टक्के राहण्याचा अंदाज व्यक्त केला होता. या अहवालाप्रमाणे आर्थिक वृध्दीदर अपेक्षित जरी राहीला नसला तरी अर्थव्यवस्थेत होणारे बदल सकारात्मक होत आहेत. जगातील कोणत्याही देशाची प्रगती ही केवळ तांत्रिकतेवर झालेली नाही तर ती त्या देशाच्या उपलब्ध नैसर्गिक साधन संपत्तीवर झालेली आहे. जगात आर्थिक महासत्ताक असणाऱ्या अमेरिका या देशाकडे 8,133.5 टन सोन्याचा साठा आहे. म्हणून आर्थिक विकासाचा वेग हा सोन्यावरुन निर्धारित होतांना दिसतो. सोन्याच्या धातूचा प्रत्येक देशाला मोह आहे. जेव्हा देशाची अर्थव्यवस्था आर्थिक संकटात सापडते. तेव्हा सोन्याचा साठा गहाण ठेवून आर्थिक संकटातून बाहेर येण्याचा मार्ग त्या देशाकडे असतो.

प्राचिन काळापासुन भारताला सोन्याचा मोह राहिलेला आहे. प्राचीन काळी भारत हा सोन्याची चिडीया आहे असे म्हटले जात होते. याचा अर्थ भारतात सोन्याचा साठा मोठया प्रमाणात होता. पण परकीयांनी भारतावर आक्रमण करुन सोन्याची लूट केलेली आहे. आज **सोने**–कोलार, हट्टी (कर्नाटक), रामगिरी (आंध्रप्रदेश), **हिरे**–पन्ना (म.प्र.), मिर्झापूर (उ.प्र.), **चांदी**–गोलफिल्ड (कर्नाटक), सिंगभूत (बिहार), **तांबे**–हजारीबाग (बिहार), खेजी (राजस्थान), **टिन**–हजारीबाग (बिहार), **लोखंड**–सिंगभूत व मातभूत (बिहार), क्रोमाईट–सिंगभूत व भागलपूर (बिहार), चूनखडी–भंडारा व यवतमाळ (महाराष्ट्र), **दगडी कोळसा**–राणीगंज (प.बंगाल), **पेट्रोलियम**–खंबायत, अंकलेश्वर, ओलापाड, बॉक्साईड–बिहार, महाराष्ट्र, मध्यप्रदेश, टंगस्टन, मंडी (हिमाचल प्रदेश), **पांढरा दगड**–जोधपूर, **लिग्नाईट कोळसा**–नेवेली (तामिळनाडू), **ॲस्बेस्टॉस डोलोमाईड**–मध्यप्रदेश व ओडिसा या ठिकाणी प्रमुख उत्पादक केंद्र देशात आहेत. या धातूच्या उत्पादनातून देशाच्या आर्थिक विकासाला आधार झाला आहे.

2016–17 मध्ये देशात 582 हजार टन सोन्याच्या खनिजाचे उत्खनन झाले. त्यातून प्रति ग्रॅम सरासरी 3.14 ग्रॅम प्रति टन सोने मिळाले 'इंडियन अहवालानुसार' 2015–16 च्या तुलनेत देशात सोन्याचे उत्पादन 20 टक्क्यांनी वाढून 1594 किलोवर पोहोचले आहे. देशात उपलब्ध सोने सर्वाधिक बिहारमध्ये (44 टक्के) आहे. त्यानंतर राजस्थान (25 टक्के), कर्नाटक (21 टक्के), पश्चिम बंगाल (3 टक्के), आंध्रप्रदेश (3 टक्के) व झारखंड (2 टक्के) यांचा क्रमांक लागतो. उर्वरीत सोन्याच्या खाणी छत्तीसगड, मध्यप्रदेश, केरळ, महाराष्ट्र आणि तामीळनाडू मध्ये आहेत. परंतु खनिजात सोन्याचा विचार करता सर्वात वरचा क्रमांक कर्नाटकचा लागतो. यानंतर आंध्रप्रदेश, बिहार आणि झारखंड येथील खाणी येतात. सोन्याचा साठा हा देशाच्या अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने किती महत्वाचा असतो हे आपणाला 1991 मध्ये निर्माण झालेल्या आर्थिक संकटातून अर्थव्यवस्थेला बाहेर काढण्यासाठी सोने गहाण ठेवल्यानंतर लक्षात आले.

सोने भारतीयांचा सर्वात आवडता धातू असल्याने जगाच्या एकतृतीयांश सोन्याची मागणी भारताकडून होते. देशात पेट्रोलियम पदार्थानतर सर्वात मोठी आयात सोन्याचीच होते. देशात एकूण सोन्यापैकी 75 टक्के सोन्याचे दागिने, 23 टक्के गुंतवणकीसाठी तर 22 टक्के औद्योगिक गरजा पुर्ण करण्यासाठी वापरले जाते. सोन्याचे केवळ 10 टक्के उत्पादन होत असतांना आपला देश सर्वाधिक म्हणजेच जगाच्या 11 टक्के सोने बाळगुण आहे. सोने हे पाहिजे तेव्हा अडचणीच्या वेळी विकून आपल्या गरजा पुर्ण करता येत असल्याने सर्वसामान्य जनतेला सोने काहीना काही अंशी आपल्याकडे असले पाहिजे असे वाटते. याचा अर्थ सोन्याचे अर्थशास्त्र हे लोकांना लक्षात येत नसले तरी प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष ते सोन्याचे अर्थशास्त्र व्यवहारात वापरतात. याच दृष्टीने संशोधनाचा अर्थ पाहणे महत्वाचे आहे.

### सोन्याचा अर्थ :

अनेक खनिजापैकी सोने हे एक आहे एक प्रसिध्द बहूमुल्य पिवळा चकाकणारा धातूपासुन अनेक आभुषण बनविली जातात. हा अत्यंत मुल्यवान, चकाकणारा, आकर्षित करणारा धातू आहे. या धातूचा उपयोग प्राचीन काळापासून सिक्के, आभुषण आणि धनसंग्रह यासाठी केलेला आहे. म्हणजेच सोन्याच्या अर्थ अनेक खनिजांपैकी एक असणारा, ज्याचा रंग पिवळा, गरजेच्या वेळी पाहिजे तेव्हा मोडता येणारा, सौंदर्यात भर घालणारा, प्रतिष्ठा वाढविणारा धनसंग्रह असणारा धातू म्हणजे सोने होय.

### संशोधनाची उद्दिष्टये :

1) जगात असलेल्या सोन्याच्या साठयाचा अभ्यास करणे.
2) देशात असलेल्या सोन्याच्या साठयाचा अभ्यास करणे.
3) सोन्याच्या किंमतीत झालेल्या बदलाचा अभ्यास करणे.

### संशोधन पध्दती :

आर्थिक विकासात सोन्याच्या साठयाचा आधार या विषयाची माहिती द्वितीय स्त्रोतांद्वारे घेतलेली आहे. यात विविध संदर्भ पुस्तके, इंडियन ब्युरो ऑफ माऊन्सचा अहवाल, द कॉन्फरन्स बोर्ड या न्युयॉर्क मधील उद्योग व संस्था अहवाल, मिनरल कमेरिटी मेमरी, वर्ल्ड गोल्ड कौऊन्सिल, इंडियन मिनरल्स इयर अहवाल, लेख, मासिके, वृत्तमानपत्रे व वेबसाईट यांचा समावेश आहे.

### जगातील सोन्याचा साठा सर्वाधिक असणारे देश :

चीन मध्ये सोन्याचा खप सर्वाधिक असला तरी तेथील उत्पादन ही जगात सर्वाधिक होत आहे. गेल्या 24 वर्षात चीनमधील सोन्याच्या उत्पादनात 150 पट वाढले आहे. भारताचे उत्पादन मात्र फारसे वाढलेले नाही. चीननंतर, ऑस्ट्रेलिया, रशिया, अमेरिका, कॅनडा, पेरु, दक्षिण अफ्रिका, मेक्सिको या देशांचा क्रमांक लागतो. भारतात सोन्याचा साठा फारच कमी आहे. पण देशात सोन्याची विक्री मोठया प्रमाणात होते. 2017 मध्ये भारताने एकूण सोन्याच्या गरजेपैकी (1014.9 टन) 991.7 सोने आयात केले होते. उर्वरित सोने पुर्नवापर प्रक्रियेतून उपलब्ध करण्यात आले होते. भारतात सोन्याची आयात स्वित्झर्लंड, संयुक्त अरबअमिती, घाना, अमेरिका, दक्षिण अफ्रिका, ऑस्ट्रेलिया, टांझानिया, पेरु, कोलंबिया, डोमनिक प्रजासत्ताक या देशातून केली जाते. डिसेंबर 2017 अखेरपर्यंत

उपलब्ध आकडेवारीचा विचार करता सध्या जगभरात 1 लाख 90 हजार टन सोने उपलब्ध आहे. त्यातील दोन तृतीयांश सोन्याचे उत्खनन हे 1950 नंतर झाले आहे. त्यापैकी सर्वाधिक म्हणजे 90,418 टन (47.7 टक्के) सोने दागिण्याच्या स्वरुपात, 40035 टन (21.1 टक्के), खाजगी गुंतवणूक 32575 टन (17.1 टक्के) सरकारकडील साठा आणि 26741 टन (14.1 टक्के) इतर ठिकाणी उपलब्ध आहे. याशिवाय भूगर्भात सुमारे 54 हजार टन सोने उपलब्ध आहे.

वर्ल्ड गोल्ड काऊन्सिलच्या अहवालानुसार जागतिक सर्वाधिक सोन्याचा साठा सर्वाधिक असणारे विविध देश पुढील प्रमाणे आहेत. ते तक्ता क्रमांक 1.1 मध्ये दर्शविले आहे.

तक्ता क्र.1.1
सर्वाधिक सोन्याचा साठा असणारे देश (2018)

| क्रमांक | देश | सोन्याचा साठा (टनामध्ये) |
|---|---|---|
| 1 | अमेरिका | 8133.5 |
| 2 | जर्मनी | 3369.8 |
| 3 | आंतरराष्ट्रीय नाणेनिधी | 2814.0 |
| 4 | इटली | 2451.8 |
| 5 | फ्रान्स | 2436.0 |
| 6 | रशिया | 1998.5 |
| 7 | चीन | 1842.6 |
| 8 | स्वित्झर्लंड | 1040.0 |
| 9 | जपान | 765.2 |
| 10 | नेदरलॅंड | 612.5 |
| 11 | भारत | 573.1 |

स्त्रोत – वर्ल्ड गोल्ड काऊन्सिल, ऑक्टोंबर 2018

वरील तक्ता 1.1 वरुन असे लक्षात येते की, जगात सर्वाधिक सोन्याचा साठा अमेरिका 8133.5 टन, जर्मनी 3369.8 टन, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी 2814.0 टन, इटली 2451.8 टन, फ्रान्स 2436.0 टन, रशिया 1998.5 टन, चीन 1842.6 टन, स्वित्झर्लंड 1040.0 टन, जपान 765.2 टन, नेदरलॅंड 612.5 टन व भारत 573.1 टन साठा आहे. अमेरिकेकडे भारताच्या तुलनेत सोन्याचा साठा 14 पटीने जास्त आहे. यावरुन आर्थिक विकासाला सोन्याच्या साठयाचा आधार झालेला दिसतो.

जगातील विविध देशाच्या खाणीमध्ये उपलब्ध असणारा मिनरल कमोडिटी मेमरी 2018 च्या अहवालानुसार सोन्याचा साठा स्पष्ट होतो.

LBP PUBLICATION

तक्ता क्र.1.2

विविध देशाच्या खाणीमधील सोन्याचा साठा

| क्रमांक | देश | सोन्याचा साठा (2018) | टक्के |
|---|---|---|---|
| 1 | ऑस्ट्रेलिया | 9800 | 18.15 |
| 2 | दक्षिण आफ्रिका | 6000 | 11.11. |
| 3 | रशिया | 5500 | 10.19. |
| 4 | अमेरिका | 3000 | 5.56. |
| 5 | इंडोनेशिया | 2500 | 4.65. |
| 6 | ब्राझील | 2400 | 4.45. |
| 7 | पेरु | 2300 | 4.26. |
| 8 | कॅनडा | 2200 | 4.07. |
| 9 | चीन | 2000 | 3.7. |
| 10 | उजबेकिस्तान | 1800 | 3.37. |
| 11 | मेक्सिको | 1400 | 2.59. |
| 12 | घाना | 1000 | 1.85. |
| 13 | कझाकस्तान | 1000 | 1.85. |
| 14 | जगातील उर्वरीत देश | 13100 | 24.26. |
| **एकुण** | | 54000. | 100.00. |

स्त्रोत इंडियन मिनरल्स इयरबुक 2017, प्रसिध्द 20018.

वरिल तक्ता क्र.1.2 वरुन असे दिसून येते की, जगातील विविध देशाच्या खाणीमध्ये ऑस्ट्रेलिया, दक्षिण आफ्रीका, रशिया, अमेरिका, इंडोनेशिया, ब्राझील, पेरु, कॅनडा, चीन, उजबेकिस्तान, मेक्सिको, घाना, कझाकस्तान व इतर देश असे अनुक्रमे क्रमांक लागतात एकूण विविध देशाच्या सोन्याच्या खाणीतील एकुण साठयात 24.26 टक्के हे इतर देशाचे सर्वात जास्त असले तरी यात अनेक देश समाविष्ट असल्याने ऑस्ट्रलियाचा प्रथम क्रमांक 18.15 टक्के सोन्याचा खाणीतील साठयाने लागतो यावरुन आर्थिक विकासाला सोने हातभार लावणारे खनिजसंपत्तीपैकी एक आहे.

## देशाच्या सोन्याच्या खाणीतील साठा :

भारताला सोन्याच्या खाणीचा प्रदिर्घ इतिहास आहे. अगदी पहिल्या शतकापासून देशात सोन्याच्या खाणी आहेत. कर्नाटकातील (सध्या रामपूर जिल्हयातील) हूडी येथील सोन्याची खाण ही जगातील सर्वात जुन्या खाणीपैकी एक आहे. सम्राट अशोकाच्या आधिपासून इथे सोन्याच्या खाणी आहेत असे मानले जाते. या ठिकाणी सापडलेल्या जुन्या लाकडाचे कार्बन किरणोत्सर्गातून कालमापन (कार्बन डेटिंग) केल्यावर असे लक्षात आल की, इथे सुमारे 1900 वर्षापासून खाणकाम सुरु आहे. सुरुवातीला 500–600 वर्षे इथे प्राथमिक पातळीवर खाणकाम सुरु होते. त्यानंतर 13–14 शतके इथे खाणकाम सुरुवात झाली आणि 1880–1920 दरम्यान मेसर्स जॉन टेलर आणि सन्स यांच्यामार्फत इथे आधुनिक पध्दतीने खाणकाम सुरु झाले. पहिल्या युध्दाच्या काळात पुन्हा येथील खाणकाम बंद झाले. हैद्राबादच्या निझामांनी 8 जुलै 1947 रोजी हैद्राबाद गोल्ड माइन्स कंपनी लिमिटेडची स्थापना केली. देशात उत्परित झालेल्या सोन्यापैकी (99टक्के) सोने म्हणजेच 1.5 टन हूडी खाणीतुन येते.

सोन्याचा खप होणारा भारत जगातील दुसरा सर्वात मोठा देश असला तरी देशांतर्गत उत्पादन वाढविण्यासाठी विशेष धोरण राबविलेले नव्हते. 2003 मध्ये खाजगी कंपन्याच सोन्याच्या लिजसाठी अर्ज करण्याची मुभा देण्यात आली. सोन्याच्या खाणीसाठी 100 टक्के भेट परकीय गुंतवणूकीची मुभा आहे. देशाच्या सोन्याच्या खाणीत उपलब्ध साठा सोन्याच्या किती आहे हे तक्ता क्र.1.3 मध्ये स्पष्ट केले आहे.



LBP PUBLICATION

तक्ता क्र.1.3
राज्यनिहाय उपलब्ध सोन्याचा साठा

| अ.क्र. | राज्य | राखीव | उपलब्ध सोन्याचा साठा | एकूण |
|---|---|---|---|---|
| 1 | कर्नाटक | 61.53. | 249.09 | 310.62 |
| 2 | राजस्थान | — | 233.11 | 233.11 |
| 3 | आंध्रप्रदेश | 8.49. | 31.05. | 39.54. |
| 4 | बिहार | — | 37.6. | 37.6. |
| 5 | झारखंड | 0.07. | 14.49. | 14.49. |
| 6 | मध्यप्रदेश | — | 8.4. | 8.4. |
| 7 | छत्तीसगड | — | 5.51. | 5.51. |
| 8 | महाराष्ट्र | — | 3.55. | 3.55. |
| 9 | तामिळनाडू | — | 1 | 1 |
| 10 | पश्मि बंगाल | — | 0.65. | 0.65. |
| 11 | केरळ | — | — | — |
| | | 70.09. | 584.65 | 654.74 |

स्त्रोत : इंडियन मिनरल्स इयर बूक, 2017 प्रसिध्द 2018

वरिल तक्ता क्र.1.3 वरुन असे लक्षात येते की, देशातील सर्वात जास्त उपलब्ध साठा हा कर्नाटक राज्यातील खाणीमध्ये आहे. या नंतर अनुक्रमे क्रमांक राजस्थान, आंध्रप्रदेश, बिहार, झारखंड, मध्यप्रदेश, छत्तीसगड, महाराष्ट्र, तामिळनाडू, पश्चिम बंगाल या राज्याचा लागतो. जगातील काही देशाच्या तूलनेत भारतात सोन्या उपलब्ध साठा फारच कमी आहे.

ज्या देशात सोन्याचा साठा जास्त आहे. त्या देशाच्या आर्थिक विकासाला सोन्याचा आधार होते. म्हणजेच आर्थिक विकासामध्ये सोन्याच्या साठयाला निश्चित महत्व आहे.

### सोन्याच्या भावातील बदल :

भारतातील जनतेला पुर्वीपासून सोन्याचा मोह राहिलेला आहे. खनिज संपत्ती मधील सोने हा एक धातू आहे. हा सोने धातू मागणीच्या तूलनेत कमी उपलब्ध होत असल्याने त्याच्या प्रति तोळा भावात वाढ होतांना दिसते. अलिकडे सोन्याच्या भावात होणारे बदल हे आंतरराष्ट्रीय बदलावर अवलंबून झाले आहेत. भारतात 1925 मध्ये सोन्याचा प्रति तोळा भाव 18.75 रुपये होता. यात वाढ होऊन आज सोन्याचा भाव प्रति तोळा 32000 रुपयापेक्षा जास्त झालेला आहे. सोन्याची मागणी ही दागिण्यासाठी, गुंतवणूकीसाठी व औद्योगिक गरजासाठी करतात. सोन्याच्या भावात कसा बदल होत गेला आहे.

तक्ता 1.4

सोन्याच्या भावातील

(प्रतितोळा, रुपयांमध्ये)

| अ. क्र. | वर्ष | भाव | वाढ/घट | वृध्दीदर |
|---|---|---|---|---|
| 1 | 1965 | 71.00 | — | — |
| 2 | 1968 | 162.00 | 91.00 | 56.17 |
| 3 | 1972 | 202.00 | 40.00 | 19.80 |
| 4 | 1976 | 532.00 | 330.00 | 62.03 |
| 5 | 1979 | 937.00 | 405.00 | 43.22 |
| 6 | 1981 | 1700.00 | 763.00 | 44.88 |
| 7 | 1982 | 1645.00 | 55.00 | 3.34. |
| 8 | 1987 | 2570.00 | 925.00 | 35.99 |
| 9 | 1990 | 3200.00 | 630.00 | 19.68 |
| 10 | 1992 | 4334.00 | 1134.00 | 26.16 |
| 11 | 1996 | 5160.00 | 826.00 | 16.00 |
| 12 | 1998 | 4045.00 | 1115.00 | 27.56 |
| 13 | 2001 | 4300.00 | 255 | 5.93. |
| 14 | 2004 | 5850.00 | 1550.00 | 26.49. |
| 15 | 2005 | 7000.00 | 1150.00 | 16.42 |
| 16 | 2007 | 10800.00 | 3800.00 | 35.18 |
| 17 | 2009 | 14500.00 | 3700.00 | 25.51 |
| 18 | 2010 | 18500.00 | 4000.00 | 21.62 |
| 19 | 2011 | 29000.00 | 10.500.00 | 36.20 |
| 20 | 2018 | 32000.00 | 3000.00 | 9.37. |
| **एकुण** | | **146.50800** | **34209.00** | **531.55** |
| **सरासरी** | | **7325.4** | **1713.45** | **26.37** |

स्त्रोत :—

वरील तक्ता क्रमांक 1.4 वरुन असे दिसून येते की, 1965 ते 2018 दरम्यान सोन्याच्या भावात अपवादात्मक काही वर्ष वगळी तर सतत वाढ झालेली आहे. 1965 मध्ये प्रतितोळा सोन्याचा भाव हा 71.00 रुपये होता. तो आज 32000.00 रुपये गेला आहे. यात सरासरी सोन्याच्या भावातील वाढ ही 1713.45 रुपये राहिलेली आहे. तर त्याचा वृध्दीदर हा 26.37 टक्के राहिलेला आहे. याचा अर्थ सोन्याच्या भावात नेहमीच वाढ झाल्याने लक्षात येते.

देशाला आर्थिक संकटातून बाहेर पडण्यासाठी सरकारला सोने गाहाण ठेवावे लागले होते. म्हणजेच देशाकडे सोन्याचा साठा जर असेल तर अशा प्रकारचा निर्णय देशाच्या सरकारला घेता येतो.

### निष्कर्ष :

1) जगातील प्रत्येक देशातील जनतेचा सोन्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन वेगळा असला तरी सोन्याचा संचय करण्याची प्रवृत्ती सर्वांची असते. नैसर्गाची देणगी सर्व देशाला सारखी मिळालेली नाही. यामुळे खजिन संपत्ती देशाकडे कमी अधिक प्रमाणात आहे. ज्या देशाला गरजेप्रमाणे उत्पादन होत नाही. त्या देशाला सोन्याची आयात



LBP PUBLICATION

करावी लागते. भारताने 2004 मध्ये सोन्याची आयात 614.5 टन केली होती ती 2007 मध्ये वाढून 769.2 टन तर 2018 मध्ये 880 टन केलेली आहे.

देशात सोन्याची आयात मोठया प्रमाणात वाढत असल्याने परकीय चलन अधिक विकासावर करण्याऐवजी सोन्याच्या आयातीवर खर्च करावे लागते. देशात सोन्याचे उत्पादन वाढविण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

2) वर्ल्ड गोल्ड अहवालानुसार जगातील सर्वात जास्त सोन्याचा साठा असणारे अनुक्रमे देत अमेरिका (8133.5 टन), जर्मनी (3369.8), आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (2814.0), इटली (2,451.8), फ्रान्स (2436.0), रशिया (1998.5), चीन (1842.6), स्वित्झर्लंड (1040.0), जपान (765.2), नेदरलॅंड (612.5) व भारत (573.1) आहेत. भारताच्या तुलनेत अमेरिकेकडे 14 पटीने सोन्याचा साठा आहे.

ज्या देशाकडे सोन्याचा साठा जास्त आहे. त्या देशाने आर्थिक विकास केल्याचे दिसते. यामुळे प्रत्येक देशाने सोन्याचा साठा वाढविण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

3) प्राचिन काळापासून भारतीय जनतेला सोन्याचा मोह राहिलेला आहे. जगाच्या एकतृतीयांश सोन्याची मागणी भारताकडून होते. देशात पेट्रोलियम पदार्थानंतर सर्वात जास्त आयात होत आलेली आहे. देशात एकूण सोन्यापैकी 75 टक्के सोन्याचे दागिणे, 23 टक्के गुंतवणूकीसाठी तर 22 टक्के औद्योगिक गरजापूर्ण करण्यासाठी वापरले जाते. आपल्या देशात एकूण सोन्याच्या गरजेपैकी 10 टक्के उत्पादन होते. आपण 10 टक्के सोन्याची आयात करतो.

सोन्याची आयात कमी करण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे.

## संदर्भ :


1. www.justdial.com
2. www.business.standred.com
3. www.gjepl.org.
4. https://economictimes.indiantimes.com
5. वर्ल्ड गोल्ड काऊन्सिल, ऑक्टोबर 2018
6. द कॉन्फरन्स बोर्ड न्युयॉर्क उद्योग व संशोधन संस्थेचा अहवाल 2017.
7. मिनरल कमोडिटी मेमरी (2018)
8. इंडियन मिनरल्स इयर बुक 2017, प्रसिध्द 2018.


LBP PUBLICATION